इमारतीचा स्लॅब कोसळून महिला जखमी

ठाणे : माजिवडा येथे गुरुवारी दुपारी एका धोकादायक इमारतीचा स्लॅब कोसळल्याने एक वृद्ध महिला किरकोळ जखमी झाली. ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिलेल्या माहितीनुसार फतिमा चर्च परिसरात वेलंकनी परिसरातील ही तीन मजली इमारत ३० ते ३५ वर्षे जुनी आहे. या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील विवेक कवीलकर यांच्या घराचा स्लॅब गुरुवारी दुपारी कोसळला. त्यात कीर्ती कवीलकर (वय ७५) यांना किरकोळ दुखापत झाली आहे.

ही इमारत 'सी-२-अ' या धोकादायक प्रवर्गात मोडत असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव महापालिका प्रशासनाकडून ती पूर्णतः रिकामी करण्यात आली आहे. येथील १२ सदनिकांमध्ये राहणाऱ्या सुमारे ४० ते ४५ रहिवाशांपैकी १२ ते १५ जणांना ठाणे महापालिकेच्या शाळा क्रमांक ४७, माजिवडा येथे तात्पुरत्या स्वरूपात हलविण्यात आले आहे. ही इमारत आता पूर्णपणे सीलबंद करण्यात आली असून याबाबत आता माजिवडा प्रभाग समिती व ठाणे महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

या घटनेमुळे महापालिका हद्दीतील धोकादायक इमारतींचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

घारापुरी बेटावर १५०० वर्षांपूर्वीच्या जलाशयाचा शोध

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : एलिफंटा लेणी असलेल्या घारापुरी बेटावर सुरू असलेल्या उत्खननात सुमारे १५०० वर्षांपूर्वीच्या दगड-विटांच्या पायऱ्या असलेल्या जलाशयाचा शोध लागला आहे. प्राचीन जलव्यवस्थापनाच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण शोध मानला जात असून 'टी' आकाराची ही रचना बेटावरील पाण्याच्या टंचाईवर मात करण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजनांचे उदाहरण असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागातर्फे (एएसआय) बेटाच्या पूर्वेकडील मोराबंदर परिसरात सुरू असलेल्या उत्खननात ही रचना सापडली. पुरातत्त्वज्ञ अधीक्षक डॉ. अभिजित आंबेकर यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने आतापर्यंत सुमारे ५ मीटर खोलवर उत्खनन केले असून त्यात २०

प्राचीन आंतरराष्ट्रीय व्यापार केंद!

येथील उत्खननात रोमन काळातील ॲम्फोरा भांड्यांचे तुकडे, मेसोपोटेमियातील 'टॉरपीडो जार' तसेच आयात केलेली काच व मातीची भांडी यांचे अवशेष मोठ्या प्रमाणात सापडले आहेत. या अवशेषांवरून हे बेट प्राचीन आंतरराष्ट्रीय सागरी व्यापार जाळ्याचा भाग होते, हे स्पष्ट होते. याशिवाय ११ नाणीही सापडली आहे. त्यापैकी काही तांब्याची नाणी कलचुरी वंशातील राजा कृष्णराज यांच्या कारकिर्दीतील असल्याचे निष्पन्न झाले आहे, असे पुण्याच्या डेक्कन अभिमत विद्यापीठातील पुरातत्त्वज्ञ डॉ. अभिजित दांडेकर यांनी सांगितले.

पायऱ्या आढळल्या आहेत. ही रचना सुमारे १४.७ मीटर लांब असून ६.७ ते १०.८ मीटर रुंद अशी आहे. हे बेट लेण्यांसाठी प्रसिद्ध असले तरी जलाशय मात्र दगड व विटांनी बांधला आहे, अशी माहिती डॉ. आंबेकर यांनी दिली. गुजरात, राजस्थानमधील बावडींसारखी ही रचना असण्याची शक्यता आहे. त्याचा विकास इसवी सनाच्या सातव्या शतकाच्या सुमारास झाल्याचे मानले जाते.

पत्राचाळ प्रकल्पातील रहिवाशांना सदनिकांचा तातडीने ताबा घेण्याचे उच्च न्यायालयाने निर्देश

'ताबा प्रक्रियेत प्रलंबित वादाचा अडथळा नको'

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : दीर्घकाळापासून रखडलेल्या गोरेगाव (पूर्व) येथील सिद्धार्थनगर म्हणजेच पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पातील विलंबाबाबत उच्च न्यायालयाने गुरुवारी कठोर भूमिका घेतली. तसेच रहिवासी आणि म्हाडातील प्रलंबित वाद हे सदनिकांचा ताबा घेण्याच्या आड येऊ शकत नाहीत, असे बजावताना रहिवाशांना त्यांच्या पुनर्वसन सदनिकांचा ताबा घेण्याचे आदेश दिले. त्याच वेळी, सदनिकांबाबतचे इतर महत्त्वाचे मुद्दे प्राधिकरणांद्वारे स्वतंत्रपणे सोडवले जातील, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) राबवण्यात आलेल्या या पुनर्विकास प्रकल्पातील सदनिकांच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित करून तसेच पर्यायी निवासस्थानाचे भाडे देणे बंद करण्याच्या म्हाडाच्या निर्णयाविरुद्ध गोरेगाव सिद्धार्थनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. तर सदनिकांचे काम मजबूत असल्याचा दावा करत म्हाडाने काही रहिवासी अन्य रहिवाशांना सदनिकांचा ताबा घेण्यापासून रोखत असल्याचा आरोप न्यायालयात केला. त्यानंतर, पुनर्वसन सदनिकांचा ताबा न घेतल्यास त्या सार्वजनिक वापरासाठी उपलब्ध करण्याचा इशारा रहिवाशांना दिला होता.

या पार्श्वभूमीवर न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठापुढे या प्रकरणी गुरुवारी सुनावणी झाली. काही रहिवाशी सदनिका ताब्यात घेण्यास तयार आहेत. तथापि, काही प्रलंबित मुद्दे अद्याप सोडवण्यात आलेले नाहीत, याकडे याचिकाकर्त्यांच्या वतीने वकील प्रदीप संचेती यांनी लक्ष वेधले. त्यात दुरुस्ती दायित्व कालावधी आणि तो सुरू होण्याची तारीख याचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. त्यावर हा कालावधी म्हाडा आणि कंत्राटदार यांच्यातील करारादारे नियंत्रित होत असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

'जमिनीबाबतही निर्णय घ्या'

जमिनीच्या क्षेत्रफळाबाबतही आक्षेप आहेत. सोसायटी १३.१८ एकर जमिनीवर आपला हक्क सांगत असताना, मोठ्या प्रमाणावरील क्षेत्राचा वेगवेगळ्या विकासकांनी पुनर्विकास केल्यामुळे सोसायटीचा हक्क केवळ ४.३ एकरपुरता मर्यादित असल्याचा म्हाडाचा दावा आहे. हा मुद्दादेखील म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित कागदपत्रांच्या आधारे निकाली काढण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

जागेचे भाडे नगण्य!

भाड्याच्या रकमेचा विचार करता, सध्या लागू असलेल्या सरकारी ठरावांनुसार कोणताही अतिरिक्त हप्ता आकारला जाऊ नये, असा दावा सोसायटीने केला. तथापि, प्रकल्पासाठी वापरलेली जमीन ही म्हाडाची असून ती सार्वजनिक मालमत्ता असल्याने, अशा रकमेच्या देयकाबाबत कोणताही वाद निर्माण होऊ शकत नाही, असे न्यायालयाने म्हटले. देय असलेले भाडे याचिकाकर्त्यांना भरावेच लागेल. त्यातही सिडकोसारख्या प्राधिकरणांकडून आकारल्या जाणाऱ्या भाड्याच्या तुलनेत हे भाडे आगदी नगण्य असल्याची टिप्पणी न्यायालयाने केली.

बहिणीची छेड काढल्याने वाद; गोळीबारात एकाचा मृत्यू

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

ठाणे : मुंब्रा येथील कैलासनगर परिसरात मानलेल्या बहिणीची छेड काढल्याच्या वादातून गुरुवारी सकाळी एका व्यक्तीने तीन जणांवर गोळ्या झाडल्या. त्यात एकाचा मृत्यू, तर दोघे जखमी झाले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कैलासनगर परिसरातील सुमनताई चव्हाण हिंदी प्राथमिक विद्यालयाजवळील बिस्मिल्ला चाळीत हा प्रकार घडला. जयन शिवानंदन नायर (५१) याच्या मानलेल्या बहिणीची छेड काढल्याने त्याचा काही जणांशी वाद झाला. यावेळी त्याने रागाच्या भरात केलेल्या गोळीबारात अब्दुल हसन शेख, अकबर अब्दुल शेख आणि समीर अहमद शेख हे तिघे गंभीर जखमी झाले. या घटनेनंतर जयन तेथून फरार झाला. मात्र मुंब्रा पोलिसांनी तातडीने कारवाई करत त्याला हत्यारासह अटक केली.

दरम्यान, जखमींना तात्काळ मुंब्रातील काळसेकर रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचारांदरम्यान अकबर अब्दुल शेख यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे कैलास नगर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी परिसरात बंदोबस्त वाढवण्यात आला आहे, अशी माहिती मुंब्रा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांनी दिली.

पश्चिम रेल्वेमार्गावर ५.३५ लाख प्रवाशांची घट

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : प्रवाशांनी मेट्रो, पर्यायी वाहनांतून प्रवास करण्यास प्राधान्य दिल्याने, पश्चिम रेल्वेमार्गावरील प्रवाशांच्या संख्येत ५.३५ लाखांनी घट झाली आहे. करोना काळापूर्वी या मार्गावर सरासरी ३४.८७ लाख प्रवाशांची नोंद करण्यात येत होती. सध्या हा आकडा सरासरी २९.५२ लाखांच्या घरात आहे. मात्र करोना काळानंतर ही संख्या स्थिर असल्याची नोंद आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील कामगिरीचा आढावा देण्यासाठी गुरुवारी पश्चिम रेल्वेद्वारे मुंबई सेंट्रल येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या वेळी पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक पंकज सिंह व वरिष्ठ रेल्वे अधिकारी उपस्थित होते. या वेळी सिंह म्हणाले की, प्रवासी संख्या कमी झाली असली तरी, महसुलात वाढ झाली आहे. करोनापूर्वी प्रवासी महसुलातून सरासरी २.१२ कोटींचा महसूल मिळत होता. तर, करोनानंतर सरासरी २.३९ कोटी रुपयांचा महसूल मिळत आहे.

पश्चिम रेल्वेवरील प्रवाशांची गर्दी विभाजित करण्यासाठी १५ डब्यांच्या लोकल फेऱ्यांची वाढ करण्यात येणार आहे. सध्या १५ डब्यांच्या २११ लोकल फेऱ्या धावत असून यात १६ लोकल फेऱ्यांची वाढ केली जाईल. तसेच अंधेरी ते वांद्रे धिम्या मार्गावर १५ डबा लोकल धावत नाही. त्यासाठी विलेपार्ले, सांताक्रूझ फलाटांची लांबी वाढवण्यात येत असून येथेही लवकरच १५ डबा लोकलची सेवा मिळेल. या जादा डब्यांमुळे लोकलची प्रवासी क्षमता ३३ टक्क्यांनी वाढते. त्यामुळे १५ डबा लोकल फेऱ्यांमुळे ४५ हजार प्रवाशांची अतिरिक्त वहन क्षमता वाढली आहे, असेही सिंह यांनी सांगितले.

विविध सुविधांसाठी प्रयत्न

ज्येष्ठ नागरिकांचा प्रवास आरामदायी होण्यासाठी पश्चिम रेल्वेच्या लोकलमधील मालडब्यात आवश्यक बदल करून, विशेष डबा तयार करण्यात आला आहे. १०५ पैकी २७ रेकमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठीचे हे डबे तयार करण्यात आले आहेत. तसेच पश्चिम रेल्वे आणि कोकण रेल्वे यांना थेट जोडणाऱ्या नायगाव-जुचंद्र रेल्वे मार्गाचा प्रस्ताव पुढे आणण्यात आला आहे. तसेच विरार ते नागदा दरम्यान अद्ययावत कवच प्रणाली राबवण्यात येत असून यामुळे आगीच्या घटना रोखण्यास मदत होणार आहे.

दादर-रत्नागिरी रेल्वेबाबत प्रशासनाची चालढकल

मार्गिका विस्तारानंतर निर्णयाचे संकेत

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : दादर-रत्नागिरी रेल्वेगाडी चालवण्याबाबत प्रवाशांची प्रचंड मागणी असताना ही रेल्वेगाडी तातडीने सुरू करण्याबाबत मध्य रेल्वे प्रशासन सकारात्मक नसल्याचे दिसून येत आहे. पाचवी-सहावी मार्गिका पूर्ण झाल्यावर दादर-रत्नागिरी रेल्वेगाडी चालवण्यात येण्याची ठाम भूमिका मध्य रेल्वेने घेतली आहे. तसेच नवीन रेल्वेगाडी सुरू करण्यासाठी रेल्वे मंडळाचा निर्णय अंतिम असेल, अशी स्पष्टोक्ती मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी केली.

मागील आर्थिक वर्षातील मध्य रेल्वेच्या कामगिरीची माहिती देण्यासाठी गुरुवारी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील इमारतीत पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक प्रतीक गोस्वामी, मुंबई विभागीय रेल्वे व्यवस्थापक हिरेश मीणा, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्निल नीला आदी उपस्थित होते.

> पायाभूत कामे सुरू असल्यामुळे लोकलच्या वक्तशीरपणात सुधारणा झाली नाही. पायाभूत कामे पूर्ण झाल्यानंतर वक्तशीरपणात वाढ होईल. **– प्रतीक गोस्वामी,** महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे

> करोनाकाळात दादर-रत्नागिरी रेल्वेगाडी बंद करण्यात आली होती. त्यानंतर सप्टेंबर २०२१ मध्ये दादर स्थानकाऐवजी दिवा स्थानकातून चालवण्यास सुरुवात केली. गाड्यांच्या वेळापत्रकावर परिणाम होत असल्याने हा निर्णय घेण्यात आला. **–डॉ. स्वप्निल नीला,** मुख्य जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे

कोलगेट-पामोलिव (इंडिया) लिमिटेड
सीआयएन: L24200MH1937PLC002700
नोंदणीकृत कार्यालय: कोलगेट रिसर्च सेन्टर, मेन स्ट्रीट,.
हिरानंदानी गार्डन्स, पवई, मुंबई – ४०० ०७६
दूर. क्र. : + ९१ (२२) ६७०९ ५०५०;
ई-मेल आयडी: investors_grievance@colpal.com
संकेतस्थळ: www.colgatepalmolive.co.in

शेअर्सच्या हस्तांतरणासाठी विशेष खिडकी

३० जानेवारी, २०२६ दिनांकित सेबीच्या परिपत्रक क्र. एचओ/३८/१३/११(२)२०२६-एमआयआरएसडी-पीओडी/आय/३७५०/२०२६ नुसार सर्व भागधारकांना अशी माहिती देण्यात आली आहे की, ५ फेब्रुवारी, २०२६ पासून ४ फेब्रुवारी, २०२७ पर्यंत एका वर्षाच्या कालावधीसाठी प्रत्यक्ष समभाग हस्तांतरणाच्या विनंत्या पुन्हा दाखल करणे सुलभ करण्यासाठी विशेष खिडकी उघडली जात आहे.

ही सुविधा ०१ एप्रिल २०१९ पूर्वी दाखल केलेल्या हस्तांतरण पत्रांसाठी आणि जी कागदपत्रे/पक्रिया/किंवा अन्यथा कमतरतेमुळे नाकारली गेली, परत केली गेली किंवा दखल घेतली गेली नाहीत त्यांच्यासाठी उपलब्ध आहे.

गुंतवणूकदारांना कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट म्हणजे एमयुएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीचे नाव लींक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) सी–०९१, एन्वसी २४७, एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई – ४०० ०८३ येथे आवश्यक कागदपत्रे सादर करून या संधीचा लाभ घेण्यास प्रोत्साहित केले जात आहे.

हस्तांतरणासाठी पुन्हा दाखल केलेले शेअर्स केवळ डिमॅट स्वरूपात दिले जातील. काही शंका असल्यास, भागधारकांनी rnt.helpdesk@in.mpms.mufg.com किंवा investors_grievance@colpal.com वर सेवा विनंती करण्याची किंवा https://swayam.in.mpms.mufg.com या स्वयम पोर्टलवर लॉग इन करण्याची विनंती केली जाते.

कोलगेट-पामोलिव (इंडिया) लिमिटेडकरिता
सही/-
जयकिशन शाह
कंपनी सेक्रेटरी आणि अनुपालन अधिकारी
सदस्यत्व क्र. : एए४९४८

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०३.०४.२०२६

सिडको शहराचे शिल्पकार

प्रस्तावाकरिता विनंती (आरएफपी)
खारघर, नवी मुंबई येथील इंटरनॅशनल कॉर्पोरेट पार्कचा (आयसीएफ) विकास

"दि सिटी अँड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड" ("प्राधिकरण" किंवा "सिडको") हे कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट ऑपरेटर (सीडीओ) ॲग्रीमेंटद्वारा सर्वसमावेशकपणे मोठ्या भूखंडाचा विकास सुकर होण्याकरिता "मध्यवर्ती कल्पनेवर आधारित प्रतिष्ठित शहर विकासा"च्या राज्य सरकारच्या मान्यताप्राप्त धोरणावर आधारित खारघर, नवी मुंबई ("प्रकल्प") येथे अशा प्रकारचे पहिले प्रकल्प, **इंटरनॅशनल कॉर्पोरेट पार्कचा (आयसीएफ) विकास** हाती घेण्याकरिता नामांकित विकासक / कंपन्यांकडून **प्रस्तावाकरिता विनंती (आरएफपी)** मागवीत आहेत.

आरएफपी अनुसूची

१) प्रसिद्धीची तारीख – **०६.०४.२०२६ रोजी स. ११.०० वा.**
२) कागदपत्रे डाऊनलोड/विक्री सुरू होणारी तारीख – **०६.०४.२०२६ रोजी स. ११.०० वा.**
३) कागदपत्रांची विक्री बंद होणारी तारीख – **१६.०५.२०२६ रोजी सायं. ०५.०० वा.**
४) आरएफपी सादरीकरण सुरू होणारी तारीख – **०६.०४.२०२६ रोजी सायं. ०५.०० वा.**
५) आरएफपी सादरीकरण बंद होणारी तारीख – **१६.०५.२०२६ रोजी सायं. ०५.०० वा.**
६) मूळ कागदपत्रांचे सादरीकरण – **२१.०५.२०२६ रोजी दु. ०४.०० वा.**
७) पूर्व-बोली सभेची तारीख – **२०.०४.२०२६ रोजी दु. ०३.०० वा.**
८) आरएफपी उघडण्याची तारीख – **१७.०५.२०२६ रोजी दु. ०३.०० वा.**
९) वित्तीय बोली उघडण्याची तारीख कळविण्यात येणार आहे.

महत्त्वाची सूचना :

१) सविस्तर आरएफपी कागदपत्रे महाराष्ट्र सरकार ई-टेंडरिंग पोर्टल : https://mahatenders.gov.in/nicgep/app यावरून डाऊनलोड करता येतील.
२) अर्जदार केवळ वरील पोर्टलमार्फत त्यांचे आरएफपीज ऑनलाइन सादर करतील.
३) शंका, जर असल्यास, mm.commercial@cidcoindia.com या ई-मेलद्वारा **०६.०४.२०२६ पासून ते १३.०४.२०२६ पर्यंत** पाठवता येतील.
४) शंकांकरिता प्रत्युत्तरे उशिरात उशिरा **२७.०४.२०२६** पर्यंत शुद्धिपत्रानुसार ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात येतील.
५) सिडको त्याकरिता कोणतेही कारण न दाखवता कोणताही किंवा सर्व आरएफपीज स्वीकारण्याचा किंवा नामंजूर करण्याचा हक्क राखून ठेवीत आहेत.

विपणन व्यवस्थापक (वाणिज्यिक)
सिडको/जनसंपर्क/००४/२०२६-२७

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

जाहीर सूचना

याद्वारे सर्व संबंधितांना सूचना देण्यात येत आहे की, आम्ही खालील मालकी हक्काची चौकशी करत आहोत: १) सर्व्हे क्र. ५५/१, ५५/१/ए आणि ५५/१/सी यांचे मालक म्हणून योगेश गोविंद पुराणिक आणि श्रीकांत गोविंद पुराणिक, २) सर्व्हे क्र. ५३/२ आणि ५३/५ यांचे मालक म्हणून योगेश गोविंद पुराणिक आणि निलेश रवींद्र पुराणिक, आणि ३) **पुराणिक बिल्डर्स लिमिटेड, जी आता पुराणिक सिटी स्प्रिंग्स प्रायव्हेट लिमिटेड ("पुराणिक")** म्हणून ओळखली जाते, सर्व्हे क्र. ५५/१ चे मालक म्हणून. खालील पहिल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीपैकी **५४/१/बी/१, ५४/३ आणि १/७/बी** आणि खालील **दुसऱ्या अनुसूचीमध्ये** अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींचा विकसक म्हणून पुराणिक, जी महाराष्ट्र राज्यातील ठाणे तालुका आणि जिल्ह्यातील मोघरपाडा गाव आणि वडवली गाव येथे स्थित आहे (सामूहिकपणे "**जमीन**" म्हणून संदर्भित), ज्यावर पुराणिक निवासी/व्यावसायिक प्रकल्प विकसित करत आहे, जसे, टॉवर १, टॉवर २ए, टॉवर २बी, टॉवर ३ए, टॉवर ३बी, टॉवर ४, टॉवर ५, टॉवर ६ए, टॉवर ६बी, आणि टॉवर ७ "**पुराणिक सिटी स्प्रिंग्स**", "**पुराणिक्स युनिकॉर्न**" या नावाखाली (सामूहिकपणे "**प्रकल्प**" म्हणून संबोधले जाईल), आणि टॉवर २ए, टॉवर २बी, टॉवर ३ए, टॉवर ३बी, टॉवर ७ मधील सर्व युनिट्सचे मालक म्हणून पुराणिक यांचा हक्क आणि खालील **तिसऱ्या अनुसूचीमध्ये** अधिक तपशीलवार नमूद केलेली युनिट्स (सामूहिकपणे "**युनिट्स**" म्हणून संबोधले जाईल). यापुढे, सदर जमीन, प्रकल्प, एफएसआय, आणि त्यावरील विकास हक्क, आणि युनिट्स यांना सामूहिकपणे "**सदर मालमत्ता**" म्हणून संबोधले जाईल.

कोणतीही व्यक्ती किंवा संस्था, ज्यामध्ये कोणताही कर्जदाता/बँक/वित्तीय संस्था समाविष्ट आहे (पिरामल फायनान्स लिमिटेड/पिरामल ट्रस्टीशिप सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड वगळून) ज्याला निर्देशित मालमत्तेच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या किंवा अंशाच्या संदर्भात विक्री, हस्तांतरण, सामंजस्य करार, करार, अदलाबदल, गहाण, तारण, भार, देणगी, विश्वस्त संस्था, वारसा, उत्तराधिकार, कौटुंबिक व्यवस्था, कौटुंबिक समझोता, ताबा, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, भाडेकरार, पोट-भाडेकरार, देखभाल, सुखाधिकार, परवाना, रजा आणि परवाना, कोळजीवाहक तत्त्वावर, मृत्युपत्राद्वारे दिलेली देणगी, वाटा, अभिहस्तांकन, धारणाधिकार, जप्ती, प्रलंबित खटला, खटला, म्हणजेच कोणताही दावा, विवाद, याचिका, अपील, किंवा तत्सम इतर कोणतीही कार्यवाही, किंवा कोणत्याही चाटप, करार, दस्तऐवज, कागदपत्र, लेखी दस्तऐवज, हस्तांतरणपत्र, मृत्युपत्राद्वारे दिलेली देणगी, हकूमनामा, किंवा कोणत्याही न्यायालयाचा आदेश, करार, करारनामे, तारण, धारणाधिकार, वांद्रारे इतर कोणत्याही पद्धतीने कोणताही आक्षेप, वाटा, लाभ, मागणी, दावा, हक्क, मालकी, आणि/किंवा हितसंबंध असेल. भागधारकांचा करार, शेअर-खरेदी करार, विकास हक्क, संयुक्त विकास हक्क, भागीदारी, एफएसआय वापर किंवा टीडीआर, प्रकल्प व्यवस्थापक, विकास व्यवस्थापक, किंवा बोजा किंवा अन्यथा, किंवा इतर कोणतेही हक्क, मागणी, दायित्व, किंवा वचनबद्धता किंवा अन्यथा कोणत्याही स्वरूपाचे असल्यास याद्वारे सूचित करणे आवश्यक आहे की, संबंधित कागदपत्रांसह, खाली नमूद केलेल्या माझ्या पत्त्यावर, सदर या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, निम्नस्वाक्षरीकार यांना लेखी स्वरूपात कळवावे, जर असा कोणताही आक्षेप आणि/किंवा दावा प्राप्त झाला नाही, तर तो विचारात घेतला जाणार नाही आणि असे मानले जाईल की, असा कोणताही दावा आणि/किंवा आक्षेप अस्तित्वात नाही, आणि तो सर्व हेतूंसाठी सोडून दिला आहे किंवा त्यागला आहे, असे मानले जाईल.

वर उल्लेखित पहिले परिशिष्ट

अ. क्र.	सर्वेक्षण क्र. / हिस्सा क्र. जुने	नवीन	७/१२ यानुसार क्षेत्रफळ (चौरस मीटर)	गाव	जिल्हा
१	–	५५/१	२,५७०.०	वडवली	ठाणे
२	–	५३/२	३,०६०.०	वडवली	ठाणे
३	–	५३/५	२५०.०	वडवली	ठाणे
४	–	५४/३	१,५००.०	वडवली	ठाणे
५	५४/१	५४/१/बी/१	८,८८८.०	वडवली	ठाणे
६	४२/१पीटी	५५/१/ए	४४०.०	मोघरपाडा	ठाणे
७	१७/१२	१/७/बी	७६०.०	मोघरपाडा	ठाणे
८	४२/१पीटी	५५/१/सी	४,०४०.०	मोघरपाडा	ठाणे

वर उल्लेखित दुसरे परिशिष्ट

अ. क्र.	सर्वेक्षण क्र. / हिस्सा क्र. जुने	नवीन	७/१२ यानुसार क्षेत्रफळ (चौरस मीटर)	गाव	जिल्हा
१	३/पीटी	६७/२	२,७००.०	मोघरपाडा	ठाणे
२	३/१पीटी	६७/१/सी	३,०५०.०	मोघरपाडा	ठाणे
३	-	५३/४	७८०.०	वडवली	ठाणे
४	-	५४/२	१,५३०.०	वडवली	ठाणे
५	५३/१	५३/१/बी	६६०.०	वडवली	ठाणे
६	-	५२/१	१,८५०.०	वडवली	ठाणे
७	४२/१पीटी	५५/१/डी/१	१५०.०	मोघरपाडा	ठाणे
८	४२/१पीटी	५५/१/डी/३	४२०.०	मोघरपाडा	ठाणे
९	१७/४	१/१२/बी	१,८६०.०	मोघरपाडा	ठाणे
१०	-	५५/६/ए/१	१,१८०.०	वडवली	ठाणे
११	१७/५	१/१३/बी	१,०५०.०	मोघरपाडा	ठाणे
१२	१७/११	१/५/सी	१४०.०	मोघरपाडा	ठाणे
१३	-	५३/३	२,४५०.०	वडवली	ठाणे
१४	-	५४/४	१,८७०.०	वडवली	ठाणे
१५	१७/पीटी	१/१०	१,८३०.०	मोघरपाडा	ठाणे
१६	४२/१पीटी	५५/१/जी	४,३१०.०	मोघरपाडा	ठाणे

वर उल्लेखित तिसरे परिशिष्ट

१. टॉवर टी६-ए (पुरानिक्स युनिकॉर्न)मधील निवासी युनिट्स:
युनिट्स क्र. ८, १०३, १०४, १०५, १०६, १०८, २०३, २०८, ३०३, ३०४, ३०८, ४०३, ४०४, ४०८, ५०३, ५०४, ५०८, ६०४, ६०७, ६०८, ७०३, ७०४, ७०८, ८०३, ११०७, १६०७, २१०७, २६०७, ३१०६, ३१०७.
२. टॉवर टी६-बी (पुरानिक्स युनिकॉर्न)मधील निवासी युनिट्स:
युनिट्स क्र. १०३, १०४, १०५, १०६, १०८, २०३, २०४, २०६, २०७, २०८, ३०१, ३०२, ३०३, ३०४, ३०६, ३०७, ४०१, ४०२, ४०३, ४०४, ४०६, ४०७, ४०८, ५०३, ५०८, ६०१, ६०३, ६०८, ७०३, ७०४, ७०८, ८०७, ९०८, १००३, ११०३, १२०३, १३०७, १४०३,१४०५,१४०८, १८०७, २००७, २३०७, २८०७, ३१०३, ३१०४, ३१०५, ३१०६, ३२०१, ३२०२, ३२०३, ३२०४, ३२०५, ३२०६, ३२०७, ३२०८,६,७,८.
३. टॉवर टी६-बी (पुराणिक्स युनिकॉर्न)मधील दुकानांची युनिट्स:
१, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १५.
४. टॉवर टी१ (पुराणिक सिटी) मधील निवासी युनिट्स:
युनिट्स क्र. १५०१, १५१०, १५०४, १५०५, १५०६, १५०८.

सदर दिनांकित ३ एप्रिल २०२६.
ठिकाण: मुंबई

सही/-
श्रीमती समरीन पालोबा
(भागीदार)
एसएनजी ॲण्ड पार्टनर्स, ॲडव्होकेट्स ॲण्ड सॉलिसिटर
वकील येथे पत्ता: १०११-१०१५ रहेजा चेंबर्स, १०वा मजला, नरिमन पॉइंट, मुंबई- ४०० ०२१
ईमेल: samreen@sngpartners.in

महाप्रित
महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित
(म.फु.मा.वि.म. ची उपकंपनी, महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

महाप्रित कंपनीमध्ये विविध संवर्गातील पदे करारतत्वावर भरण्याबाबत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीला मुदतवाढ देण्याबाबत

महाप्रित कंपनीसाठी करारतत्वावर पदे भरण्याकरिता लोकसत्ता व इंडीयन एक्सप्रेस या वर्तमानपत्रात तसेच महाप्रित्च्या संकेतस्थळावर तपशीलवार जाहिरात दि. १३/०३/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार अर्जदारांकडून अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दि.३१/०३/२०२६ होती.

अ.क्र.	पदनाम	पदसंख्या
१	मुख्य महाव्यवस्थापक (Corporate Affairs)	०१
२	उपमहाव्यवस्थापक (वित्त व लेखा)	०१
३	सहाय्यक कंपनी सचिव	०१
४	व्यवस्थापक (ESG-Business Development)	०१
५	लेखा सहाय्यक	०२
	पुणे कार्यालय	
६	उपअभियंता (RE Cum IT), पुणे कार्यालय	०१
७	व्यवस्थापक (Renewable Energy/Project)	०१
८	सहाय्यक अभियंता ((RE), पुणे कार्यालय	०१

वरीलप्रमाणे प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्यासाठी **दि.१५/०४/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.** तरी इच्छुक उमेदवारांनी **https://forms.gle/gDpaDNCadLdbXvoU9** या लिंकवर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. **अर्ज करण्याची शेवटची मुदत दि. १५/०४/२०२६ संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत राहील.** ऑनलाईन अर्ज सादर करण्यास तांत्रिक अडचण असल्यास **dgm.admin@mahapreit.in** या ई-मेलवर अर्ज सादर करावेत. तसेच सदर जाहिरातीच्या अटी व शर्ती, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता व अनुभव यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात आलेला नाही. अधिक माहितीकरिता कृपया **https://mahapreit.in** या संकेतस्थळावर भेट द्यावी.

कार्यकारी संचालक (प्रशासन) महाप्रित

Reliance Industrial Infrastructure Limited
नोंदणीकृत कार्यालय: ४ था मजला, कोर्ट हाऊस, लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई – ४०० ००२
दूरध्वनी: +९१-२२-७९६७ ९०५३ • ईमेल: investor_relations@ril.in
CIN: L60300MH1988PLC049019

सूचना

(कंपनीच्या इक्विटी भागधारकांसाठी)
विषय: कंपनीच्या इक्विटी समभागांचे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरणात हस्तांतरण

गुंतवणूकदार शिक्षण आणि संर